सकाळ



हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : निरीक्षणशक्ती

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (25 November 2023)

असं म्हणतात, की सगळेच जण आजूबाजूच्या गोष्टी पाहत असतात; परंतु फार कमी व्यक्ती लक्षपूर्वक निरीक्षण करतात आणि फारच क्वचित लाखात एखाद्यालाच असामान्य दृष्टी असते! आपण आपल्या मुलांना लक्षपूर्वक निरीक्षण करायला नक्की शिकवू शकू. त्यासाठी लहान वयापासून त्यांची ‘नजर’ तयार करायला पाहिजे. या नजरेचेही प्रकार असतात.

घारीची नजर : दूरवरचं दिसणं किंवा बारीक गोष्टसुद्धा नजरेतून न सुटणं ही घारीची खासियत. आपल्या मुलांना निसर्गात घेऊन जाणं, पक्षितज्ज्ञांबरोबर पक्षिनिरीक्षणाची सवय लावणं, रात्री अंधारात आकाशातील ताऱ्यांची-नक्षत्रांची ओळख करून घेणं ही सगळी घारीची नजर तयार करण्याची उदाहरणं.

**शिकाऱ्याची नजर :** आता एकाच बारक्या बिंदूवर/लक्ष्यावर लक्ष केंद्रित न करता, समोरच्या संपूर्ण दृश्याकडे एकाच वेळेस सहज बघत त्यातून वेगळेपणा अथक सावज टिपणं ही शिकाऱ्याची खासियत! विसंगती शोधणं, विविध आकृत्यांमधून सारख्या आकृत्या शोधणं, चित्रांमधील चुका शोधणं, रंगसंगतीमधील वेगवेगळ्या छटा ओळखणं, अगदी रस्त्यावर ट्रॅफिक जॅममध्ये आजूबाजूच्या गर्दीत वेगळेपणा शोधणं यांसारख्या खेळांतून आपणही शिकाऱ्याची नजर तयार करू शकू.

**कवीची नजर :** 'जे न देखे रवी ते देखे कवी' या उक्तीप्रमाणे समोरच्या वातावरणातून काय बघायचं आहे हे आधीच ठरवून बघितलं, तर सामान्य वाटणाऱ्या घटनांमधून बरेच नवे संदर्भ लागू शकतात. ही 'कवीची नजर' खरंतर शास्त्रीय संशोधनात निष्कर्ष काढताना जास्त उपयुक्त होऊ शकते. त्यासाठी मुलांबरोबर छोटेमोठे शास्त्रीय प्रयोग करताना त्याबद्दल आधी नक्की चर्चा करा.

**संवेदनशील नजर :** आजूबाजूच्या वातावरणातील संवेदना, भावना टिपणं, त्यातील कलात्मकता जाणून घेणं हे कौशल्य संवेदनशील नजरेचं. सध्याच्या भपकेबाज जगात ही नजर हरवून जातीय! आपण मोठ्यांनी विशेष प्रयत्न करून लहान वयापासून 'भावनांचे शिक्षण' मुलांना दिलं, तर त्यांच्यातला कलाकार, मूर्तिकार, वास्तुरचनाशास्त्रकार, समीक्षक, विचारवंत जागा होईल.

**मनाची किंवा आतली नजर :** डोळे बंद केल्यावरही दिसू शकेल, अशी मनाच्या पडद्यावर उमटणारी चित्रं- अर्थात ही नजर कुठल्याही शिक्षणानं येत नाही, तर आतूनच असावी लागते! एक असामान्य व्यक्ती घडण्याची ती सुरुवात असू शकते!

पालकमित्रांनो, आपल्या मुलाची नजर, निरीक्षणशक्ती विकसित करायची असेल, तर आपणच मुलांकडे नव्या 'नजरे'नं बघायला लागेल.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com